# उपवनसंरक्षक, सातारा वन विभाग, सातारा यांचे कार्यालय

'वनभवन' , गोडोली रोपवाटीका, सातारा ४१५ ००१

☎ (०२१६२)२२००५८, फॅक्स : (०२१६२) २२००५९ ईमेल : forest.satara68@gmail.com


जा. क्र. ब/जमीन/प्र.क्र.२२/२०१७.१८/३४९६

सातारा,दिनांक: १५ /१२/२०१७.

प्रति,

जनरल मॅनेजर (टेक),
प्रकल्प संचालक,
भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,
स.नं. १३४/१, बायफभवन, कॅम्पस,
वारजे, पुणे.

**विषय** - construction of new six lane tunnel at khambataki Ghat section of NH-4 and is aproaches from existion km-771.730 to existion km 782.000 in the state of Maharashtra joint site inspection and tree counting in forest stretch regarding proposal no. FP/MH/Road/25101/2017 reg.

**संदर्भ** - १. आपलेकडील पत्र क्र. NHAI/PUI/PUNE/ Khambatki -forest/2017/1397 दिनांक ११/०३/२०१७.
२. इकडील पत्र क्र. ब/जमीन/प्र.क्र.२२/२०१७.१८/३३२१ दिनांक २१/११/२०१७
३. दिनांक २८/११/२०१७ रोजीची स्थळ पहाणी.

वरील संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये आपण राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ पुणे-सातारा खंबाटकी घाट नवीन बोगदा करण्यासंदर्भात वन (संवर्धन), अधिनियम, १९८० अंतर्गत प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार संदर्भ क्र. २ अन्वये स्थळ पहाणी करणे करीता कळविण्यात आले होते. त्यानुसार दिनांक २८/११/२०१७ रोजी संयुक्त स्थळ पहाणी केली असता असे निदर्शनास आले आहे की, आपण प्रस्तावित दोन्ही बोगद्याचे जागेवर कोणतेही पक्के सिमांकन केलेले नाही. आपणासी चार्च केल्याप्रमाणे दोन्ही बोगद्याची रुंदी प्रत्येकी २० मीटर असुन दोन बोगद्यामध्ये ३० मीटर अंतर सोडले असुन बोगद्याच्या दोन्ही कडेला १० मीटर अंतर सोडले असल्याचे आपण सांगितले आहे. तथापी जोगवर त्याप्रमाणे कोणतेही पक्के सिमांकन केलेले नाही. तरी वरील प्रमाणे ० मीटर, १० मी., ३० मी., ६० मी., ८० मी., ९० मी. याप्रमाणे बोगद्याचे रुंदीनुसार वनपरिक्षेत्र वाई व खंडाळा यांचे वनहद्दीतील सिमांकन करण्यात यावे.

तसेच सदर प्रस्तावाची तपासणी केली असता त्यामध्ये प्रामुख्याने खालील त्रुटींची असल्याचे निदर्शनास आले आहे.

१. प्रस्तावात cheak list ची आवश्यकता नाही.

२. प्रस्तावामधील part - II, III, IV, V हे विहीत प्रपत्रामध्ये नाहीत.



Scanned by CamScanner

३. Annexure - I, List of Certificates चे Remark मध्ये Y असे नमुद केले आहे. तरी या ठिकाणी प्रस्तावातील प्रमाणपत्रे, नकाशे किंवा जी कागदपत्रे नमुद आहेत. त्यांचे पान क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. तसेच INDEX मध्ये ही पान क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे.

४. मौजे वेळे, ता. वाई व मौजे वान्याचीवाडी, ता. खंडाळा येथील एकुण ४.६३७५ हे. वनजमीन लागणार आहे. या दोन्ही गावाचे ग्रामसभा ठराव, ग्रामसभेस उपस्थित ग्रामस्थ यांचे स्वाक्षरी रजिस्टर झेरॉक्स इत्यादी कागदपत्रांचे आधारे उपविभागीय स्तरावरील Dwellers Act, 2006 अंतर्गत उपविभागीय समितीचे बैठकीचे इतिवृत्त जोडुन सादर करावे.

५. जिल्हाधिकारी, यांचे Dwellers Act, 2006 अंतर्गत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

६. सदर प्रकल्पास ४.६३७५ हे. वनजमीन लागणार असलेने तेवढीच पर्यायी जमीन उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

७. सदर प्रस्तावात वृक्षतोड होणार असलेने झाडांची यादी (घेरीवार) जोडणे आवश्यक आहे.

८. Net Present Value (DCF Certififcate) प्रमाणपत्रातील माहिती भरुन घ्यावी.

९. No Objection Certificate from the Gramsabha चुकीचे आहे. ग्रामसभेची NOC घेणे आवश्यक आहे. ती जोडावी.

१०. प्रमाणपत्रांना क्रमांक देण्यात यावेत, पान क्रमांक द्यावेत व त्या त्या क्रमाने जोडाण्यात यावी.

११. Alternat Examined प्रमाणपत्र चुकीचे आहे. Alternat No. 3 मध्ये लागणारे वनक्षेत्र १.६८ हे. दर्शविले आहे व प्रस्तावामध्ये ४.६३७५ हेक्टर लागणार असलेचे कळविले आहे. तरी त्याप्रमाणे सुधारित करुन जोडावे.

१२. online सादर करणेत आलेल्या प्रस्तावातील part - I ची छायांकीत प्रत प्रस्तावात समाविष्ठ केलेली नाही. सदरची प्रत प्रस्तावात समाविष्ठ करावी.

१३. सदर प्रस्तावातील Area Statement मध्ये प्रकल्पासाठी लागणारे क्षेत्र ४.९७५ हे. एवढे दर्शविली आहे. तथापी प्रस्तावात वेगवेगळ्या ठिकाणी व प्रमापत्रात प्रकल्पासाठी लागणारे क्षेत्र ४.६३७५ हे. एवढे दर्शविले आहे. तरी प्रकल्पासाठी निश्चित किती क्षेत्र लागणार आहे याची निश्चिती करावी व त्याप्रमाणे वरील त्रुटींची पुर्तता करुन प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा.

सोबत - प्रस्तावाची मुळ प्रत

(अ.मो. अंजनकर)
उपवनसंरक्षक
सातारा वन विभाग सातारा.

प्रत - सहाय्यक वनसंरक्षक (वनीकरण) / (रोहयो व वन्यजीव), सातारा यांना माहितीसाठी.

प्रत - वनक्षेत्रपाल, खंडाळा /वाई यांना माहितीसाठी.

385 E:\Amit\Land Letter. 2017-18.docx.docx

Scanned by CamScanner